FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: २५, वर्ष Year: २०१८, दिनांक Date: ०२/०८/२०१८

2. (i) अधिनियम Act: ० , कलमे Sections: भ्र.प्र.अधि. १९८८ (संशोधन)
   (ii) अधिनियम Act: — , कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from ११/०७/२०१८, वेळ Time ........, तारीखे पर्यंत Date to ०१/०८/२०१८, वेळ Time १६:४२
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date २५/०७/२०१८, वेळ Time १२:५७
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........, तारीख Date ०२/०८/२०१८, वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road: बृहन्मुंबई महानगर पालिका, नेत्र रुग्णालय, पहिला माळा कार्यालय
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State: मौलाना शौकतअली मार्ग, कामाठिपुरा मुंबई
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: आकाश एकनाथ कुंदे (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: एकनाथ कुंदे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: २८ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ८९२८५९३६८७
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: नोकरी
   (g) धर्म Religion: हिंदु, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address: मु.पो. वैतरणा, ता. शहापूर, जि. ठाणे; Ward, House/Name No., Phone/M. No., Pan No., Card No.
   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉमं 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   धोंडीराम शंकरराव बडगर, वय ४० वर्षे.
   गायत्री अपार्टमेंट, रु.नं. १०४, कल्याण - भिवंडी रोड, रिलायन्स पेट्रोल पंपासमोर
   कोनगाव, कल्याण (प) जि. ठाणे.

क

यातील फिर्यादी आकाश एकनाथ कुंदे वय २८ वर्षे, धंदा- नोकरी रा.ठी. मु.पो. वैतरणा, ता. शहापूर जि- ठाणे यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर संगणीकृत करण्यात आली असून तिच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे. ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष

Akurde

[signature]
2-08-2011

(सुनिल वसंत बिले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे, धोंडीराम शंकरराव बंडगर ४०वर्ष (लिपीक) यांनी कायदेशीर परिश्रमा खेरीज फिर्यादी श्री. आकाश एकनाथ कुंदे यांचे चार महिन्यांचे थकीत वेतन काढून दिल्याचा मोबदला / बक्षीस म्हणून फिर्यादीकडे दि. ०१/०८/२०१८ रोजी ७,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. ५,०००/- रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा कलम ७ भ्र.प्र. अधिनियम (संशोधन) १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक. सुनिल बिले.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

2-8-2018

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुनिल वसंत बिले

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र. ..........

Posting ला.प्र.वि. मुंबई

Code No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा Akunde

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

X

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ०२/०८/२०१८

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद दिनांक ०१/०८/२०१९

श्री. आकाश एकनाथ कुंदे, वय २८ वर्षे, धंदा – नोकरी, रा.ठि.– मु.पो. वैतरणा, ता. शहापुर, जि. ठाणे, मो.नं. ८६००७६८४५६

––––ooo––––

मी वर नमूद प्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी आई सुशिला, पत्नी सौ. गौरी वय २४ वर्षे, मुलगा हर्ष, (मुलगी एक महिन्याची), लहान भाऊ सागर, व अक्षय यांचेसह एकत्रीत कुंटूबात वास्तव्यास आहे. माझे मुळ गाव सोमज, ता. इगतपुरी, जि. नाशीक आहे. माझे शिक्षण दहावी पर्यन्त वैतरणा येथे झालेले आहे. माझे वडील एकनाथ नामदेव कुंदे बृहन्मुंबई महानगर पालीकेमध्ये वाहन चालक म्हणुन वरळी येथे कार्यरत होते. त्यांचे सन १९९९ मध्ये निधन झाले नंतर पिटी केस म्हणुन त्यांचे जागेवर सन २०१० मध्ये माझी नोदणी सहायक पदावर बृहन्मुंबई महानगर पालीकेमध्ये नियुक्ती झालेली आहे.

सद्या मी म.न.पा. कार्यालयाचे जन्म मृत्यु नोंदणी विभाग कामाठीपुरा, मुंबई येथे नोंदणी सहायक पदावर कार्यरत आहे. मी सन २०११ ते डिसेंबर २०१५ पर्यत जन्म मृत्यु नोंदणी विभाग कामाठीपुरा, मुंबई येथे नेमणुकीस होतो त्यानंतर सन २०१५ मध्ये पदोन्नतीवर माझी नेमणुक राजावाडी रुग्णालय, घाटकोपर येथे बदली झाली. सदर ठिकाणी हजर झाल्यांनतर मला नियीमत पगार मिळत होता. सन २०१६ मध्ये माझी परत मुळ पदावर म्हणजे नोंदणी सहायक पदावर परेल, मुंबई येथे नेमणूक झाली. त्यानंतर माझी बदली म.न.पा. कार्यालयाचे जन्ममृत्यु नोंदणी विभाग कामाठीपुरा मुंबई येथे झाली. सदर ठिकाणी मी कर्तव्य करीत असताना फेब्रूवारी २०१९ पर्यन्त माझा पगार नियमीतपणे राजावाडी रुग्णालय, घाटकोपर येथुन निघत होता. त्यांनतर मार्च २०१९ नंतर माझा पगार मिळाला नाही म्हणुन मी एफ साउथ परळ, मुंबई येथे पगार मिळण्याबाबत लेखी विनंती अर्ज केला. सदरचा अर्ज हा नेत्र रुग्णालय, कामाठीपुरा येथील कार्यालयात पाठविण्यात आला. सदर कार्यालयाकडुन मी नेत्र रुग्णालयात कामास नसल्याचा शेरा लिहुन सदरचा अर्ज परत एफ साउथ येथे पाठविण्यात आला. त्यावर नेत्र रुग्णालय येथील संबधीत कर्मचारी यांना एफ साउथ विभाग, येथे बोलविले. त्यांवर त्यांच्याशी चर्चा होवुन एफ साउथ विभागाकडुन माझे वेतन नेत्र रुग्णालयात काढण्याबाबत तोंडी आदेश दिले.

दि. १२/०७/२०१९ रोजी सकाळी ०९.३० वा. सुमारास नेत्र रुग्णालयातील लिपीक श्री बंडगर यांनी माझे मोबाईलवर संपर्क साधुन / माझे वेतन काढुन देतो असे सांगितले. त्याच दिवशी पुन्हा सायंकाळी ०५.३० वा. चे सुमारास लिपीक श्री बंडगर यानी माझे मोबाईलवर संपर्क करुन म.न.पा., मुख्य कार्यालय, फोर्ट मुंबई येथे येण्यास सांगितले. मी, म.न.पा. मुख्य कार्यालयास गेल्यावर लिपीक बंडगर यांना भेटलो, तेव्हा त्यांनी मला सांगितले की, मी वेतन काढतो, मला आता एटीएम मधुन दहा हजार रुपये घेवुन ये, तुझे काम करतो. त्यावर मी त्यांना सांगितले की, मला चार महिन्याचे वेतन मिळालेले नाही.

दि. १५/०७/२०१९ रोजी नेत्र रुग्णालय, येथे येवुन लिपीक बंडगर यांना भेटलो असता, त्यांनी पुन्हा माझे वेतन काढुन देण्याबाबत रु. १०,०००/– इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे पैसे नसल्याचे सांगितले. त्यावर बंडगर यांनी मला दि ०१/०८/२०१९ रोजी वेतनाची थकीत रक्कम जमा झाल्यावर केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन रु.१०,०००/– इतकी रक्कम देण्यास सांगितले.

मला लोकसेवक श्री. बंडगर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. २५/०७/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाकडे ई–मेलद्वारे तक्रार नोंद केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मला त्यांच दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे पो.नि. बिले यांनी फोन करुन तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली. त्यावर मी, पो.नि. बिले यांना मला लोकसेवक श्री. बंडगर

यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार करायची आहे असे सांगितले असता, पो.नि. बिले यांनी मला तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सरपोचखानवाला रोड, वरळी मुंबई येथे प्रत्यक्ष येण्यास सांगितले. म्हणुन मी दि. २६/०७/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे पो नि बिले यांना भेटुन स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली. त्यावर पो.नि. बिले यांनी लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारीची लगेच पडताळणी करण्याबाबत माझेकडे विचारणा केली त्यावर मला लोकसेवक बंडगर यांनी मला दि.०१/०८/२०१९ रोजी लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले असल्याने पडताळणीस जाण्यास नकार दिला.

दि. ३१/०७/२०१९ रोजी लोकसेवक श्री बंडगर यांनी त्यांचा मो.न.७४९८१६९५२२ वरुन माझा मोबाईल न. ८६००७६८४५६ वर मला संपर्क करुन असे सांगितले की, 'तुझे पगाराची रक्कम मी मंजुर केलेली आहे, तेव्हा तु कधी पैसे घेवुन येतोस?' त्यावर मी त्यांना दि.०१/०८/२०१९ रोजी येतो असे सांगितले.

मी दिनांक २६/०७/२०१९ रोजी दिलेल्या लेखी तक्रारीस अनुसरुन पो.नि. बिले यांना लाप्रवि कार्यालयास आज दि. ०१/०८/२०१९ रोजी येवुन भेटलो. पो.नि. बिले यांनी मला माझ्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी व सापळा कारवाई घेण्यात येणार असल्याचे माहिती दिली. तसेच सदर पडताळणीच्यावेळी लोकसेवक व माझेमधील संभाषण माझ्या बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येवुन ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांचेसह लोकसेवक बंडगर यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भातील कारवाई सुरु करण्यात आली. माझे सोबत लाचेच्या मागणी संदर्भातील पडताळणी कारवाईच्यावेळी मी, पंच सतिश दरबस्तेवार यांचेसह लोकसेवक बंडगर यांना नेत्र रुग्णालयातील त्यांच्या कक्षामध्ये जावुन भेटलो, त्यावेळी त्यांनी माझे रु. १,१०,०००/– थकीत वेतनाची रक्कम माझे वेतन खात्यामध्ये भरण्यात आली असल्याचे सांगुन सदर केलेल्या कामासाठी रु.७०००/– रक्कमेच्या लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझेकडे पैसे नसल्याचे लोकसेवक बंडगर यांना सांगितले असता, त्यांनी मला एटीएम व्दारे पैसे काढुन आणण्याबाबतचा सल्ला दिला. त्यावर मी माझे एटीएम कार्ड हरवल्याचे सांगुन कार्यालयात जावुन बॅकेतुन पैसे काढुन आणतो. असे सांगितले त्यावर बंडगर यांनी ठिक आहे असे सांगितल्यावर मी त्यांचे कार्यालयातुन निघुन बाहेर येवुन परत पोलीस वाहनाजवळ जावुन पो.नि.बिले यांना लोकसेवक बंडगर यांनी रु.७०००/– लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. स.पो.आ. देशमुख मॅडम, पो.नि.बिले यांनी पडताळणी दरम्यान माझ्या शर्टच्या आतील बनियानला लावलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले त्यावेळी लाचेच्या मागणीबाबत खात्री झाल्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरविले. लाचेसाठी माझ्याकडे बचती मधील रु. ५०००/– इतकी माझेकडे शिल्लक असलेली रक्कम पो.नि. बिले याना सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी दिले. सदरच्या रक्कमेस पोलीस चालक श्री. हाटकर यांनी पोलीस वाहनामध्ये अॅन्थॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. बिले यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच मला लोकसेवक बंडगर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर इशारा म्हणुन सापळा पोलीस पथकास दिसेल अश्या पध्दतीने उजवा हात वारंवार डोक्यावरुन फिरविण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच श्री. सतिश दरबस्तेवार असे लोकसेवक श्री. बंडगर यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक बंडगर यांच्या कार्यालयाच्या आवारात सापळा पथक हजर होते. लोकसेवक बंडगर यांच्या कार्यालयात आल्यावर मी त्यांच्या कक्षात गेलो असता आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक बंडगर यांनी केलेल्या कामाचा मोबदला/ बक्षीस म्हणुन माझेकडे पैशाची मागणी केल्यावर मी त्यांना माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु. ५०००/– लोकसेवक बंडगर यांना दिली ती त्यांनी उजव्या हाताने

समक्ष
Bhile
1-8-2019
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

Akunde

स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशातुन काळया रंगाच्या लेदर पॉकीट काढुन त्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाबाहेर येवुन लाच स्विकारल्याबाबत डोक्यावर वारंवार उजवा हात फिरवून पुर्व नियोजित इशारा केल्यावर कक्षाच्या बाहेर उभे असलेले सापळा पथकातील अधिकारी व अमंलदारांनी लोकसेवक बंडगर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले.

वरील नमुद दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक बंडगर यांचेशी माझे झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले. सदर ध्वनिमुद्रीत संभाषण पो.नि. बिले यांनी मला ऐकवून माझे मदतीने पोलीस अंमलदार कुडवे यांच्या मार्फतीने त्याची प्रतिलिपी संगणकावर तयार केली. मी व लोकसेवक बंडगर यांचे मध्ये झालेले संभाषण ओळखुन त्याबाबत पोलीस अंमदार कुडवे यांना दिलेल्या माहितीवरुन श्री कुडवे यांनी संभाषणासमक्ष तशी नोंद घेतली आहे.

लोकसेवक धोंडीराम शंकरराव बंडगर यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी लोकसेवक बंडगर यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज चार महिन्याचे थकीत वेतन काढुन दिल्याचा मोबदला/ बक्षीस म्हणुन माझेकडे दि.०१/०८/२०१९ रोजी रु. ७,०००/– इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.५,०००/– रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

Biue 1-8-2019

(सुनिल बिले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Akumle